# बातम्यांच्या बांधावर

राज्यातील कृषि शिक्षण, संशोधन तसेच विस्तार कार्यासंबंधी सद्यस्थितीस अनुसरून भविष्यातील दिशा ठरविण्यासाठी सर्वंकष चर्चा करण्यासाठी कृषि आयुक्तालय, पुणे येथे बैठक पार पडली. या बैठकीस ना. श्री. संजय धोत्रे, उपाध्यक्ष, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीस मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह (कृषि आयुक्त तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे), कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) श्री. विजय घावटे, माजी. कुलगुरू डॉ. राजाराम देशमुख, डॉ.सुभाष पुरी, डॉ. शंकरराव मगर, डॉ. व्यंकट मायंदे, डॉ.योगेंद्र नेरकर, डॉ. अरविंद सावंत, तसेच माजी कृषि संचालक, श्री.जयंत देशमुख, श्री. पांडुरंग वाठारकर, श्री.व्ही.डी. पाटील, श्री. युवराज साळुंखे व इतर अधिकारी उपस्थित होते.



---



**जळगाव** : कृषि व फलोत्पादन राज्यमंत्री श्री. सदाभाऊ खोत १५ ऑगस्ट २०१८ रोजी ध्वजवंदन कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर मा. मंत्रिमहोदय यांनी कापूसपिकावरील शेंदरी बोंडअळी व्यवस्थापन व निर्मूलन-प्रचार प्रसिद्धीसाठी तयार केलेल्या चित्ररथाचे, घडीपत्रिका, भित्तिपत्रिकांचे उद्घाटन केले. राशी सीड्स, निर्मल सीड्स, लक्ष्मी ॲग्रो इंडस्ट्रीज व अंकुर सीड्स यांनी गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी चित्ररथ तयार केले आहेत. मा. जिल्हाधिकारी, जळगाव महापालिकेचे आयुक्त या वेळी उपस्थित होते. जळगाव जिल्ह्यात सुरू असलेल्या गुलाबी बोंडअळी निर्मूलन-प्रचार व प्रसिद्धी, नियोजन इ.बाबत कृषि विभागामार्फत करण्यात आलेले नियोजन, केलेला प्रचार व प्रसिद्धीबाबत माहिती मा. कृषिमंत्री यांनी घेतली. जिल्ह्यातील निवडक पाच शेतकऱ्यांना मृद आरोग्यपत्रिकेचे वाटप मान्यवरांच्या हस्ते झाले. कृषि विभागामार्फत गुलाबी बोंडअळी निर्मूलनासाठी केलेल्या नियोजन, प्रचार व प्रसिद्धीबाबत माहिती देण्यात आली. गुलाबी बोंडअळी व्यवस्थापनाबाबतच्या भित्तिपत्रिकेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मौजे-नशिराबाद, ता. जळगाव येथील श्रीमती पूनम युवराज चौधरी यांचे कापूस व मूग या आंतरपीक शेतामध्ये गुलाबी बोंडअळी नियंत्रणासाठी लावण्यात आलेल्या कामगंध सापळ्यांची प्रत्यक्ष पाहणी करून उपस्थित शेतकऱ्यांशी मंत्रिमहोदयांनी चर्चा केली. मुक्ताईनगर तालुक्यातील मौजे ढोरमाळ येथे कापूस कीडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांशी चर्चा केली. माजी कृषिमंत्री श्री. एकनाथ खडसे, खासदार रक्षाताई खडसे या वेळी उपस्थित होत्या. त्यानंतर राज्यमंत्री महोदयांनी गुलाबी बोंडअळी निर्मूलनाबाबत कृषि विभागाने केलेल्या कार्यवाही व नियोजनाबाबत समाधान व्यक्त केले. तसेच, श्री. खडसे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव होण्याची कारणे व त्यावरील उपाययोजना, याबाबत माहिती देऊन कृषि विभागाने या हंगामाच्या सुरवातीपासून या संदर्भात केलेल्या कार्यवाहीबद्दल समाधान व्यक्त केले. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी संभाजी ठाकूर, कृषि उपसंचालक श्री. अनिल भोकरे, उपविभागीय कृषि अधिकारी श्री. गोरक्षनाथ लोखंडे, तालुका कृषि अधिकारी, मुक्ताईनगर श्री. बाळासाहेब व्यवहारे व तालुका कृषि अधिकारी, जळगाव श्री. लक्ष्मण तळेले तसेच कृषि विभागाचे क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी व शेतकरी बांधव या वेळी उपस्थित होते.



# बातम्यांच्या बांधावर



पुणे : शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने येत असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी राज्यस्तरीय परिसंवाद आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी पुणे कृषी महाविद्यालयात नुकतीच बैठक आयोजित करण्यात आली. कृषि आयुक्त मा. श्री. सचिंद्र प्रताप सिंह यांच्या प्रमुख उपस्थिती ही बैठक झाली. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सरकारला व्यावहारिक उपाययोजना सुचवाव्यात त्यामुळे त्याची अंमलबजावणी विहीत कालमर्यादेत पूर्ण करण्यास मदत होईल, असे मत मा. आयुक्तांनी व्यक्त केले. या बैठकीस महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक ढवण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास भाले, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त कांतिलाल उमाप, फुलोत्पादन संचालनालयाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद, माजी कुलगुरू श्री. वार्ष्णेय, माजी अपर मुख्य सचिव उमेशचंद्र सरंगी, कृषी विभागाचे फलोत्पादन संचालक श्री. प्रल्हाद पोकळे, डॉ. किरण कोकाटे, डॉ. शरद गडाख, कृषिसंचालक (वि. प्र.) श्री. विजय घावटे, कृषि सहसंचालक (वि. प्र.) श्री. अनिल बनसोडे व सर्व विभागीय कृषी सहसंचालक, केंद्र शासनाच्या कृषी संशोधन केंद्रांचे संचालक उपस्थित होते.

**पुणे** : सहकार चळवळीचे अध्वर्यू व देशातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याचे प्रवर्तक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची जयंती राज्यात 'शेतकरी दिन' म्हणून साजरी करण्यात आली. दि. २५ ऑगस्ट रोजी पुणे येथे साखर संकुलच्या आवारात डॉ. विखे पाटील यांच्या पुतळ्यास कृषि आयुक्त मा. सचिंद्र प्रताप सिंह यांनी अभिवादन केले. 'आत्मा' सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात पुणे विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. मुकुंद तापकीर, कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) श्री. विजयकुमार इंगळे, कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) श्री. विजय घावटे, कृषि सहसंचालक श्री. अनिल बनसोडे, विभागीय कृषि सहसंचालक श्री. दिलीप झेंडे, श्री. तुकाराम जगताप, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. दादाराम सप्रे, श्री. विनयकुमार आवटे, श्री. बी. जे. पलघडमल, श्री. किसनराव मुळे, इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





कृषि आयुक्त श्री. सचिंद्र प्रताप सिंह यांनी मुळशी तालुका बीजगुणन प्रक्षेत्रास भेट दिली. या वेळी उपविभागीय कृषि अधिकारी श्री. चंद्रकांत भोर यांनी प्रक्षेत्रावर सुरू असलेल्या विविध कामांबाबत माहिती दिली. प्रक्षेत्रावरील युरिया ब्रिकेट तयार करण्याच्या यंत्राची पाहणी आयुक्तांनी केली. १३ कोटी वृक्ष लागवड योजनेत मा. आयुक्त यांनी वृक्षलागवड केली. प्रक्षेत्रावर चालू असलेल्या नियंत्रित भात पुनर्लागवडीची पाहणी करून स्वत: भातलागवड केली. तसेच, युरिया ब्रिकेटच्या वापराची माहिती घेऊन लागवड पूर्ण झालेल्या क्षेत्रावर स्वत: युरिया ब्रिकेट लावल्या. तसेच मौजे खारवडे येथे त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. वार्ताफलकावर टोल फ्री क्रमांक लिहिण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. शेतकऱ्यांशी चर्चा करताना पीकपद्धती, बियाणेबदल, भाताची नियंत्रित पद्धतीने लागवड, युरिया ब्रिकेटचा वापर, पीकसंरक्षण आदी बाबतींत मार्गदर्शन केले. २०२२ पर्यंत कृषि उत्पादन दुप्पट करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. या भेटीच्या वेळी तालुका कृषि अधिकारी श्री. गणेश तांबे, मंडल कृषि अधिकारी श्री. झंजे, श्री. पी. एस. राऊत, कृषि पर्यवेक्षक श्री. डी. आर. शेजूळ, डी. एन. सरडे व कृषि सहाय्यक श्री. वाघ, गुंडाळकर, श्री. पिंगळे, श्री. साळुंखे, पाणलोट पथक सदस्य श्री. मोरे व बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.